# निशाणी ८२ वरील आदेश

प्रस्तूतचा अर्ज मुळ वादी क्र. १अ याने त्याचे सरतपासावर दाखल असा आदेश करुन त्याऐवजी त्याचा मुलगा मुखत्यारधारक अमोल दत्तात्रय जगताप याचा सरतपास देण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्ज व नि. क्र. ८३ म्हणणे वाचले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

२. वादी क्र. १अ यास मणक्याचा जुना विकार बळावल्याने, दोन वेळा गोचीड ताप व अन्य आजारपणामुळे तसेच वाढत्या वयामुळे हजर राहून जबाब देणे, दाव्याचे कामकाज पाहणे शक्य होणार नाही असे त्याने अर्जात नमूद केले आहे. मात्र त्याला असा कोणताही आजार आहे याबाबत कसलाही कागदोपत्री पुरावा त्याने या कामी सादर केला नाही. त्यामुळे या कारणावर मुळीच विश्वास ठेवता येणार नाही.

३. वादी क्र. १अ चे सरतपासाचे शपथपत्र दिनांक ०३/०९/२०१८ इ रोजी सादर करण्यात आले आहे. त्यानंतर वादीमार्फत नि. क्र. ७९ ला बी.एन.डी. प्रकरणातील कागदपत्रे मागण्याचा अर्ज दाखल करण्यात आला व त्या अर्जाच्या निकालाकरीता जून २०१९ पर्यंतचा वेळ विनाकारण वाया गेला आहे. तो अर्ज गुणावगुणावर नामंजूर झाल्यानंतर पुढील तारखेस वादींनी प्रस्तूतचा अर्ज सादर केला आहे. यावरुन वादी मार्फत या कामी विनाकारण विलंब करण्यात आला आहे असे दिसून येते. तसेच

प्रतिवादी यांनी देखील दिनांक २१/११/२०१८ इ रोजी दाखल केलेल्या नि. क्र. ७९ च्या अर्जावर दिनांक १८/०६/२०१९ इ रोजी म्हणणे दाखल केले आहे असे दिसून येते. परिणामी प्रतिवादी यांच्याकडून देखील विलंब करण्यात आला आहे असे अभिलेखावरुन दिसून येते. सबब उभय पक्षकारांची अशी विलंबाची वर्तणूक पाहता व वरील कारणास्तव प्रस्तूतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र नाही असे मला वाटते. परिणामी, खालील आदेश मी पारीत करत आहेः

## आदेश

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

Girish Sudarshan Mane

Digitally signed by Girish Sudarshan Mane
DN: cn=Girish Sudarshan Mane, ou=Judiciary, o=Bombay High Court, st=Maharashtra, c=IN
Date: 2019.08.21 16:19:42 +0530

स्थळ : कोरेगाव.

दि. २१/०८/२०१९

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
कोरेगाव.